**LIB 013**

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य


**संपादक**
**संचालक**
मानव्यविद्या आणि सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

**कार्यकारी संपादक**
**डॉ. प्रकाश बर्वे**
प्रमुख,ज्ञान स्रोत केंद्र
संपादक मंडळ

श्री. नारायण बारसे, ठाणे
डॉ. जगदीश कुलकर्णी, नांदेड
डॉ. शालिनी लिहितकर, नागपूर
डॉ. सिद्धी जगदाळे, मुंबई
डॉ. सारिका सावंत, मुंबई
डॉ. जयंत नंदागवळी, नाशिक



©२०२४

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



**निर्मिती**
श्री. विलास बधान, प्रमुख (प्र.),
ग्रंथनिर्मिती केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**मुद्रक व प्रकाशक**
श्री.दिलीप भरड कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222


---

**संपादकीय साहित्य पाठविण्यासाठी**


**ई-मेल : editordyangangotri@ycmou.ac.in**



❖ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ व तज्ज्ञ सल्लागार मंडळ सहमत असेलच असे नाही.



**तज्ज्ञ सल्लागार मंडळ**

**डॉ. राजेंद्र कुंभार**
प्राध्यापक, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे- 411 007

**डॉ. मोहन खेरडे**
संचालक, ज्ञानस्रोत केंद्र
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती- 444 602

**डॉ. रणजीत धर्मापुरीकर**
निवृत्त माहिती शास्त्रज्ञ
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड- 431 602

**डॉ. अनिल चिकाटे**
संचालक, ज्ञानस्रोत केंद्र
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव – 425 401

**डॉ. सुषमा पौडवाल**
निवृत्त ग्रंथपाल
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई – 400 049

# ज्ञानगंगोत्री

**वर्ष : २५वे ज्ञानगंगोत्री : सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२४ अंक : २**

**अनुक्रमणिका**

**ISSN 2231-6507**


- संपादकीय :
- ग्रंथालय तंत्रज्ञान : एक आव्हान आणि संधी : रणजित धर्मापुरीकर
- ओपन ॲक्सेस संसाधने पोर्टल ब्लूप्रिंट@श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ : डॉ.सारिका सावंत, वृशाली राणे, श्रीमती अंजली बिनीवाले
- ज्ञान स्त्रोत केंद्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर : रुपाली राजेश गायकवाड
- सार्वजनिक ग्रंथालये एक लोकशिक्षण केंद्र : प्रा. विजयकुमार पाईकराव
- आंतरविद्याशाखा : भारतीय विद्यापीठांमधील एक उभरती अभ्यास शाखा : प्रो (डॉ ) मीनल ओक

## संपादकीय

कोणत्याही शिक्षण व्यवस्थेत आणि संशोधन संस्थांमध्ये ग्रंथालय आणि “माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगातही ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे महत्व” या आपल्या लेखात रणजित धर्मापुरीकर यांनी ग्रंथालयांचे महत्त्व विषद करतांना. ग्रंथालयाच्या झपाट्याने विकसित होत असलेल्या एकंदरीत अवकाशात, तंत्रज्ञान हे एक आव्हान आणि संधी दोन्ही बनले आहे. वाचन साहित्याने सुसज्ज अशी एक शांत जागा म्हणून ग्रंथालयांची पारंपारिक प्रतिमा, डिजीटल माहिती, माहितीचा ग्रंथालयातील आपापसातील सहयोग, आणि शिक्षणाच्या गतिमान केंद्रात रुपांतरीत होत आहे. ग्रंथपाल म्हणून हा बदल स्वीकारने केवळ ऐच्छीक नाही; आपल्या व्यवसायीक वाढीसाठी आणि संस्थेच्या निरंतर प्रासंगिक कार्यासाठी ते आवशक आहे. या बाबत ची माहिती आपल्या ग्रंथालय तंत्रज्ञान एक आव्हान आणि संधी या लेखात दिली आहे.

डॉ.सारिका सावंत, वृशाली राणे, श्रीमती अंजली बिनीवाले यांनी ओपन ॲक्सेस (ओए) म्हणजे परवाना आणि कॉपीराइट निर्बंधांशिवाय इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या सर्व इलेक्ट्रॉनिक संसाधने. ओपन ॲक्सेस संसाधनांमध्ये लेख, जर्नल्स, पुस्तके, परिषदेची कार्यवाही, प्रबंध, व्हिडिओ, संगीत इत्यादीं ची सखोल माहिती आपल्या लेखातून दिली आहे.

रुपाली राजेश गायकवाड यांनी आपल्या लेखात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हा तंत्रज्ञानाचा एक संच आहे जो संगणकांना बोली आणि लिखित भाषा पाहणे, समजणे, भाषांतरित करणे, डेटाचे विश्लेषण करणे, शिफारशी करणे यासह विविध प्रगत कार्ये करण्यास कसे सक्षम आहे हे मांडले आहे.



प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी आपल्या सार्वजनिक ग्रंथालये एक लोकशिक्षण केंद्र या लेखातून मानवी संस्कृति आणि निसर्गसंपत्ती यांचा सुसमन्वय साधणारे ज्ञान देणे हा सार्वजनिक ग्रंथालये लोक शिक्षण केन्द्राचा महत्वपूर्ण उद्देश आहे. अध्ययनार्थी वाचकांचे जीवन उंचावण्यासाठी त्यांच्या ज्ञानात न कौशल्यात वृध्दी करण्यासाठी, तसेच भौतिक प्रगती व ज्ञानाला नैतिक आधार देण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची लोकशिक्षणाची भूमिका किती महत्त्वाची आहे हे आपल्या लेखातून मांडले आहे.

प्रो (डॉ ) मीनल ओक यांनी आपल्या आंतरविद्याशाखा भारतीय विद्यापीठांमधील एक उभरती अभ्यासशाखा या लेखात ग्रंथालय शास्त्र हे कसे आंतरविद्याशाखेशी निगडीत आहे याची विस्तृत माहिती दिली आहे .या सर्व लेखांचा ग्रंथालयात काम करीत असतांना ग्रंथपाल आणि या विषयांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना नक्की उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो .

# ग्रंथालय तंत्रज्ञान:एक आव्हान आणि संधी

**रणजित धर्मापुरीकर, नांदेड.**

**प्रस्तावना**

ग्रंथालयाच्या झपाट्याने विकसित होत असलेल्या एकंदरीत अवकाशात, तंत्रज्ञान हे एक आव्हान आणि संधी दोन्ही बनले आहे. वाचन साहित्याने सुसज्ज अशी एक शांत जागा म्हणून ग्रंथालयांची पारंपारिक प्रतिमा, डिजीटल माहिती, माहितीचा ग्रंथालयातील आपापसातील सहयोग, आणि शिक्षणाच्या गतिमान केंद्रात रुपांतरीत होत आहे. ग्रंथपाल म्हणून हा बदल स्वीकारने केवळ ऐच्छीक नाही; आपल्या व्यवसायीक वाढीसाठी आणि संस्थेच्या निरंतर प्रासंगिक कार्यासाठी ते आवशक आहे.

हे समजून घेण्यासाठी ग्रंथालयाच्या भविष्याला आकार देणाऱ्या कांहीं वर्तमान तंत्रज्ञानाच्या उपयोगीतेचा शोध घेऊ. सुरवात करुयात, डिजीटल ग्रंथालये आणि रिपॉजिटरीज पासून. डिजिटल संसाधनांच्या वाढीमुळे माहिती कशी संग्रहित आणि ऍक्सेस करावी यात क्रांतिकारक बदल झाला आहे. ग्रंथालये आता विस्तीर्ण डिजिटल रिपॉजिटरीजचे केंद्र झाले आहे, ज्यामुळे वाचकांना, संशोधकांना कधीही, कुठेही संसाधनांचा वापर करणं शक्य झाले आहे. डिस्पेस या संस्थात्मक रिपॉजिटरीजच्या सॉफ्टवेअर द्वारे अनेक उच्चशिक्षित संस्थांनी डिजिटल संसाधनाचे संचयिका (रिपॉजिटरीज) तयार केले आहेत, ज्यामुळे



ग्रंथपालासाठी डिजिटलायजेशनचे ज्ञान आणि त्याच्या व्यवस्थापनात निपुण असणें अत्यावश्यक बनले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्णिंग : आपण माहिती कशी व्यवस्थापित करतो आणि पुनर्प्राप्त करतो यात बदल होतो आहे. वाचकांना, संशोधकांना संसाधने शोधण्यास मदत करणाऱ्या चॅटबॉट्स पासून ते एआय चलित डेटा ऍनॅलॅटिक्सपर्यंतची तंत्रज्ञाने वाचकांचा, संशोधकांचा अनुभव, शोध घेताना केलेल्या प्रयत्नांच्या कार्यक्षमतेत भर पाडत आहेत. त्यामुळे निर्णय घेणं सोयिस्कर होतं आहे.

बिग डेटा आणि डेटा ऍनॅलॅटिक्स (विशाल विदा आणि विदा विश्लेषक: ग्रंथालयात विविध कार्यावर आधारित विविध प्रकारच्या नोंदी केल्या जातात. यात कांहीं नोंदी जाणूनबुजून केल्या जातात तर काही नोंदी नकळतपणे होतात. यात ग्रंथालय व्यवस्थापनाच्या दैनंदिन नोंदी पासून ते वाचकांच्या वाचन सवयी पर्यंत मोठ्या प्रमाणात डेटा संकलित होतो. या डेटांचा आणि विश्लेषण साधनांचा वापर केल्याने वाचकांचे वाचन वर्तन समजून घेणे शक्य होते. त्यानुसारच वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाचकानुकूल सेवा नव्याने तयार करता येतात.

ब्लॉकचेन तंत्रज्ञान हे डिजिटल खातं किंवा लेजर, सुरक्षित ऑनलाईन नोटबुक सारखे आहे. जे व्यवहार किंवा माहितीची नोंद ठेवते. ही नोंद बऱ्याच संगणकावर सामायिक केली जाते. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालयांना त्यांच्या सेवेबाबतच्या वाचकांच्या विविध संगणकाद्वारे केलेल्या खात्रीशीर सूचनांचे संकलन व त्याचं विश्लेषण करून पुढील सेवा नियोजन, सुधार

करण्यास वाव मिळतो. तसेच यात डिजिटल रेकॉर्डची अखंडता जपण्याची क्षमता आहे.

व्हर्च्युअल आणि ऑगमेंटेड रिऍलिटी तंत्रज्ञान ग्रंथालयामधे शिक्षणाच्या अनुभवांना नवीन दिशा देतं आहे. या तंत्रज्ञानामुळे ऐतिहासिक संग्रहणांचे अभासी अनुभव घेता येणे शक्य झाले आहे. आणि अभ्यासाचे वाचन साहित्य अधिक आकर्षक आणि प्रभावी बनवले जाते आहे. ज्यामुळे वाचकांना अभ्यासकांना शिक्षण अधिक रोचक वाटत आहे. उदा. असे काही ज्ञानकोश आहेत ज्यामधील माहितीवर बोटाने स्पर्श केला की वाचकांना त्या माहितीची विस्तृतपणे केलेली मांडणी अभासी स्वरूपात केलेली दिसते.

तंत्रज्ञानाच्या युगात करिअरमध्ये प्रगती होत आहे. या तांत्रिक प्रगतीमुळे ग्रंथालय व्यावसायिकांसाठी करिअरच्या नवीन संधी, नवे मार्ग प्राप्त होत आहेत. उदाहरणार्थ यात खालील नव्या संधींचा समावेश होतो.

1.डिजीटल लायब्ररीयनशिप : डिजिटल लायब्ररी, डिजिटल प्रिझरवेशन आणि डिजिटल ॲसेट मॅनेजमेंटमधे स्पेशलायझेशन केल्यास आधुनिक ग्रंथालयाच्या वातावरणात अग्रस्थान मिळू शकते. डिजिटल क्यूरेशन आणि डेटा मॅनेजमेंट मधील पदवी/पदवीका/ प्रमाणपत्र कोर्सेस करिअर घडवण्यासाठी मौल्यवान आहेत.

2.डेटा लायब्ररीयनशिप: अलिकडे ग्रंथालये अधिक विदा (डेटा) चलित झाल्याने डेटा-ग्रंथपालाच्या भुमिकेला जो डेटा-व्यवस्थापन, डेटा-विश्लेषण आणि डेटा-गोपनीयता समजू शकेल अशा व्यक्तींना जास्त मागणी व महत्व



असेल. आर पायथॉन किंवा एसक्यूएल सारख्या डेटा मॅनेजमेंट अप्लीकेशनमधे प्राविण्य प्राप्त केले तर या क्षेत्रात भरपूर ग्रंथालय उपयोगी वेगळ कांहीं करु शकतो.

3.माहिती तंत्रज्ञान विशेषज्ञ : जे ग्रंथपाल ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या ज्ञानाला माहिती तंत्रज्ञानाची सांगड घालतात जसे की सॉफ्टवेअर मॅनेजमेंट सायबर सुरक्षा किंवा नेटवर्क व्यवस्थापन ते डिजिटल संसाधनाचे व्यवस्थापन आणि संरक्षण करण्यासाठी स्वतः माहिती तंत्रज्ञान विशेषज्ञ म्हणुन कार्य करतीलच तसेच इतरांनाही सहकार्य करू शकतात.

4.ज्ञान व्यवस्थापक आणि सल्लागार: ग्रंथालय शास्त्र आणि नवीन तंत्रज्ञान या दोन्ही गोष्टी समजून घेऊन, ज्ञान व्यवस्थापनात मुख्य भूमिकेत कार्य करणे शक्य आहे. एखाद्या संस्थेच्या धोरणात्मक हक्काच्या फायद्यासाठी सल्लागार म्हणून कार्य करता येते.

5.ग्रंथालय वाचकांच्या ग्रंथालयाच्या वापर सवयीनुसार व्यवस्थापन: आजची ग्रंथालये वाचक केंद्रित झाल्याने, युजर एक्सपिरीयेन्स डिझाईन मधील कौशल्य डिजिटल आणि पारंपारिक ग्रंथालयाच्या वाचकांचा वाचनानुभव वाढवणाऱ्यावर भर देणार्या करिअरसाठी दरवाजे उघडू शकतात.

6.भविष्याची तयारी : करिअरच्या मार्गावर यशस्वीपणे प्रयत्न करण्यासाठी, आयुष्यभर शिकण्याची तयारी असायला हवी. कार्यशाळा, ऑनलाईन आभ्यासक्रम तसेच प्रमाणपत्र कोर्सेस द्वारे सतत व्यावसायिक ज्ञान मिळवणं आवश्यक आहे. संबंधित विषयावरील नियतकालिके मधे प्रकाशित प्रचलीत

कल दर्शविलेल्या लेखांचा अभ्यास करणे, परिषदेत उपस्थित राहाणं आणि प्रोफेशनल नेटवर्क मध्ये सहभागी होऊन नवीनतम ट्रेंड्सची माहिती करून घेणे. या गोष्टी आधुनिकतेच्या उंबरठ्यावर तुम्हांला घेऊन जातील. या व्यतिरिक्त नव्या संधीचा गांभिर्याने विचार करून इतरांना यात सहभागी करून घेण्याचे सॉफ्ट स्किल्स पुर्वीच्या पेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. जसेजसे तंत्रज्ञान विकसित होत आहे तसतसे माहितीचे क्लिष्ट स्वरुपाचा अर्थ लावणे, विविध विषयांमध्ये सहयोग करणे, ग्रंथालय सेवांचे मुल्य वाचकांना, अभ्यासकांना समजावून सांगणे ही यशाची गुरुकिल्ली असेल हे निश्चित.

ग्रंथालय माहितीशास्त्र आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय हा नावीन्य आत्मसात करत करिअर वाढीसाठी एक सुयोग्य संधी आहे. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून निरंतर शिक्षणासाठी वचनबद्ध राहुन, केवळ आपल्या करिअरमध्ये प्रगती होत नाही, तर संपूर्ण संस्थेला संलग्न असलेल्या ग्रंथालयाच्या अभूतपूर्व कामगिरीने मुळ संस्था (पालक संस्था) गती मान व महत्त्वपूर्ण म्हणून गणले जातील.

# ओपन ॲक्सेस संसाधने पोर्टल ब्लूप्रिंट@श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ

**डॉ.सारिका सावंत,**
**डॉ वृशाली राणे,**
**श्रीमती अंजली बिनीवाले**
श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ ,मुंबई

**सारांश**

ओपन ॲक्सेस (ओए) म्हणजे परवाना आणि कॉपीराइट निर्बंधांशिवाय इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या सर्व इलेक्ट्रॉनिक संसाधने. ओपन ॲक्सेस संसाधनांमध्ये लेख, जर्नल्स, पुस्तके, परिषदेची कार्यवाही, प्रबंध, व्हिडिओ, संगीत इत्यादींचा समावेश असू शकतो.

**प्रस्तावना**

गेल्या दशकात शैक्षणिक संसाधनांच्या किमती लक्षणीय वाढल्या आहेत आणि या नवीन खर्चांची पूर्तता करण्यासाठी शैक्षणिक ग्रंथालयांचे बजेट वाढले नसल्यामुळे अभ्यासपूर्ण संशोधन आणि संप्रेषणात ओपन ॲक्सेस मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आहे. ओपेन ॲक्सेस मूवमेंट ही उदयास नेण्याची अनेक कारणे आहेत जसे की जर्नल च्या किमतीमध्ये वाढ, संशोधनपर साहित्य मिळण्याबत ची आसमानता, इंटरनेट चा अधिक वापर, इत्यादि आहेत. ओपेन ॲक्सेस मूवमेंट ही फक्त जर्नल्स च्या वाढत्या किमती संदर्भात नसून त्याची पोच ही ओपेन डाटा, ओपेन शेक्षणिक साहित्य, ओपेन सायन्स ह्या संदर्भात ही आहे. ओपेन ॲक्सेस चे हे पैलू वेगवेगळ्या समुदायांवर वेगवेगळ्या प्रकारे



परिणाम करतात, परंतु सर्व खुल्या शिष्यवृत्तीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. अधिक मूलभूत स्तरावर, ओए प्रकाशित अभ्यासपूर्ण सामग्रीवर लागू होते, ज्यामुळे ते सर्वांसाठी ऑनलाइन विनामूल्य उपलब्ध होते. ओए अभ्यासपूर्ण संप्रेषण निकषांमध्ये फिट बसतो. कोणत्याही प्रतिष्ठित जर्नलप्रमाणेच, ओए जर्नल्स सुद्धा: पीअर रिव्ह्यू असतात, संशोधन डेटाबेसमध्ये अनुक्रमित आहेत आणि कॉपीराइट करारबद्ध असतात.




Image 1: Types of OA

Picture Credit: Foster Open Science (PASTEUR4OA)

## ओपन ॲक्सेस

**ग्रीन ओए:** या प्रकारच्या ओपन ॲक्सेसमध्ये पीअर-पुनरावलोकन केलेले लेख समाविष्ट आहेत जे त्यांच्या प्री-किंवा पोस्ट-प्रिंट आवृत्तींमध्ये आहेत. या लेखांचे लेखक प्रस्थापित नियतकालिकात प्रकाशित होणाऱ्या लेखाची अंतिम आवृत्ती ओपन ॲक्सेस रिपॉझिटरी/डिपॉझिटरीमध्ये जमा करतील. ओए रिपॉझिटरीमध्ये जमा केलेल्या आवृत्तीचा कॉपीराइट लेखकाकडेच राहील. बर्‍याचदा प्रकाशकांच्या नियमांची पूर्तता करण्यासाठी लेखकाने या लेखांसाठी एक निर्बंध (एक ठराविक कालावधी जिथे लेख केवळ ओए जाण्यापूर्वी खरेदीद्वारे उपलब्ध असेल) स्थापित केला.

**गोल्ड ओए:** या प्रकारच्या ओपन ॲक्सेसमध्ये पारंपारिक जर्नल प्रकाशकाद्वारे प्रकाशित लेखांचा समावेश आहे. लेखक प्रक्रिया शुल्क (एपीसी) म्हणजे लेखकाने दिलेले लेख, अनुदान, प्रायोजक संस्था यांनी दिलेला लेख प्रकाशित करण्यासाठी भरलेले शुल्क आहे. पण बऱ्याच वेळेस हे शुल्क अस्सल कारणांसाठी माफ ही केले जाते. डायमंड ओ ए मध्ये लेखक प्रक्रिया शुल्क प्रकशकामार्फत घेतली जात नाही. बऱ्याचश्या भारतीय संस्था ह्या डायमंड ओ ए स्वरूपात अस्तित्वात आहेत उदाहरार्थ इंडियन ऍकॅडमी ऑफ सायंसेस, निस्केअर इत्यादी.

**हायब्रीड ओए:** या प्रकारच्या ओपन ॲक्सेसला बर्याचदा "पेड ओपन ॲक्सेस" म्हणून संबोधले जाते. हायब्रीड जर्नल्स ची सदस्यता घेतली जाते परंतु त्यात वैयक्तिक ओए लेखांचा समावेश असेल. ही नियतकालिके वर्गणी शुल्क आणि लेखक प्रक्रिया शुल्क (एपीसी) द्वारे प्रकाशित केली जातात.



**ओपन ॲक्सेस चे फायदे:**अधिक लोक अभ्यासपूर्ण संशोधनपर लेख वाचू शकतात, ज्यात अशा लोकांचा समावेश आहे ज्यांना अन्यथा त्या माहितीत प्रवेश करणे शक्य होणार नाही कारण त्यांना महागड्या जर्नलची सदस्यता परवडत नाही.नवीन कल्पना अधिक वेगाने आणि व्यापकपणे पोहचवल्या जाऊ शकतात, ज्यामुळे नवीन संशोधन अभ्यासास चालना मिळते; ज्ञानाला चालना देण्याचे काम करते.वैज्ञानिक संशोधनात असे दिसून आले आहे की ओपन ॲक्सेस मध्ये अडथळ्यांशिवाय प्रकाशित करणे, त्यामुळे लेखास जगभरात विसिबीलिटी, अधिक सायटेशन्स, अधिक डाउनलोड आणि अधिक प्रभावास कारणीभूत ठरतात.ओपन ॲक्सेस चा अर्थ व्यापक पुनर्वापर देखील असल्याने अलीकडील ज्ञानाचा "मुक्त शैक्षणिक स्त्रोत" म्हणून शिक्षणात त्वरित वापर केला जाऊ शकतो.

## ओपन / फ्री ॲक्सेस पोर्टल: श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ

एका मेजर रिसर्च प्रोजेक्ट चया अंतर्गत ह्या पोर्टल चे निर्माण झाले. संशोधकांनी विचारपूर्वक शिस्त बद्ध पद्धतीने आखणी करत पोर्टल तयार केले गेले. पहिल्यांदा विद्यापीठाच्या शिक्षकांना ओपन ॲक्सेस बद्दल प्रश्नावली मार्फत माहिती मागवण्यात आली गेली. शिक्षकांना असलेली/नसलेली ओपन ॲक्सेस ची माहिती, शिकवण्यात येणारे विषय, कॉपीराइट /ओपन लायसेन्स, रेपोझिटरी ला दिलेले योगदान याबद्दल विचारले गेले. त्यानंतर छाननी करून योग्य ते 36 टोपिक्स आणि सबटोपिक्स निवडले गेले जे विद्यापीठात पदव्युत्तर विभागात शिकले जातात.

पोर्टल चां आराखडा बनवताना इतर विद्यापीठातील / संस्थेतील अश्याप्रकरचे

पोर्टल पाहिले गेले त्यामुळे नेमक काय काय पोर्टल मध्ये टाकता येईल ह्याचा विचार केला गेला. मुख्यत्वे पोर्टल सहा भागामध्ये विभागले गेले आहे. ते ह्या प्रमाणे: होम पेज, अबाऊट अस, विषयानुसार रिसोर्सेस, अफॅक्यू, व्हिडिओज, कॉन्टॅक्ट अबाऊट अस मध्ये प्रोजेक्ट आणि संशोधकांबद्दल ची माहिती दिली गेली आहे. ज्या ज्या व्यक्तींनी हे पोर्टल बनवण्यासाठी योगदान दिले त्यांचीहि माहिती दिली गेली आहे.

सुबजेक्ट्स मध्ये ३५ वेगवेगळ्या विषयांची माहिती दिली गेली आहे जे विषय एसएनडीटी महिला विद्यापीठात शिकवले जातात. एक फाइल मिक्स विषयांची ही आहे ज्या मध्ये, इमेजेस, विडियो, ऑडिओ, क्लिपार्टचे स्त्रोत दिले गेल आहेत. म्हणजे जेणेकरून कुणालातरी कॉपीराइट फ्री इमेजेस हवे असतील तर ती व्यक्ति अश्या लिंक्स वर क्लिक करून शोधू शकतात. अनेक आयआर रेपोझिटोरी च्या डायरेक्टरी बद्दल माहिती दिली गेली आहे.

कॉन्टॅक्ट अस मध्ये जर कुणाला विशेषत: शिक्षकांना रिसोर्सेस मध्ये भर घालायची असेल तर सुचवण्यासाठी म्हणून आणि इतर काही सूचना देण्या करिता बनवले गेले आहे. दोन्ही प्रोजेक्ट को ऑर्डीनेटरर्स ची दिली गेली आहेत.

FAQs मध्ये संभाव्य प्रश्न जे यूजर कडून पोर्टल बद्दल येवू शकतात हे लिहिले गेले आहेत. त्या मध्ये ही 3 प्रकार करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जनरल प्रश्न, ओपेन ॲक्सेस आणि फ्री ॲक्सेस बद्दल चे प्रश्न व त्यांची उत्तर दिली गेली आहेत. व्हिडिओज हे पेज खास आहे. त्यामध्ये पोर्टल कसे वापरायचे, त्यात रिसोर्सेस शोधायचे कसे, पोर्टल नक्की काय आहे, गूगल स्कॉलर, ओपन ॲक्सेस मूवमेंट ची माहिती, ओपन लायसेन्स बद्धल ची माहिती. तसेच यूजीसी



केअर लिस्ट मध्ये जर्नल्स कसे शोधायचे, अश्या प्रकारचे विडियो तयार करून ठेवले गेले आहेत. हे विडियो बनवण्यासाठी संशोधकांनी गो प्रो कॅमेरा, क्यान्वा, ओपेन शॉट विडियो एडिटिंग सॉफ्टवेअर, हन्द्लब्रेक, स्क्रीनपाल असे सॉफ्टवेअर वापरले गेले आहेत. भविष्यात अजून भरपूर अश्या उपयोगी विडियो बनवण्याची योजना आहे.




Image 2: Home page of OA Portal

Picture Credit: SNDT WU website



## List Of Subjects

| SR. | LIST OF SUBJECTS |
|---|---|
| 1. | Administrative Services |
| 2. | Analytical Chemistry |
| 3. | Business Administration & Management |
| 4. | Clinical Nutrition & Dietetics |
| 5. | Commerce |
| 6. | Computer Science |
| 7. | Early Childhood Development |
| 8. | Economics |
| 9. | Education Management |
| 10. | Electronics & Communication Engineering |
| 11. | English |
| 12. | Ergonomics |
| 13. | Extension & Communication |
| 14. | Food and Nutrition |
| 15. | Geography |
| 16. | History |
| 17. | Hospitality & Administration |
| 18. | Human Development |
| 19. | Interior Design |
| 20. | Jewellery Design Management |
| 21. | Law |
| 22. | Library & Information Science |

Open Access/Free Resources Portal
About US
List of Subjects
Frequently Asked Questions
Videos
Contact US

Image 3: Subjects in OA portal






Image 4: Videos in OA portal

## निष्कर्ष

वाचन, शोध आणि सामायिकरणातील अडथळे कमी करून, ओपन ऍक्सेस, डिस्कवरी आणि नवकल्पनांना चालना आणि वाढवते देखील. वैज्ञानिक शोध आणि अंतर्दृष्टी यांचे व्यापक सामायिकरण जगाला लाभ देणारे बदल, शोध, उपचार आणि उपायांना गती देते. ओपन ऍक्सेस चे बरेचसे फायदे आहेत. जसे की ते तुमच्या कामासाठी अधिक एक्सपोजर मिळते, विकसनशील देशांतील संशोधक तुमचे काम पाहू शकतात, प्रॅक्टिशनर्स तुमचे निष्कर्ष लागू करू शकतात, उच्च उद्धरण दर, तुमचे संशोधन धोरण ठरवू शकते, लोक तुमच्या सशोधनाचे निष्कर्ष पाहू शकतात, अनुदान नियमांचे पालन केले जाते, करदात्यांना त्यांच्या पैशाचे मूल्य मिळून जाते. SNDT WU che portal बनवणे हा एक प्रवासाची सुरवात आहे, ह्यात अजून भरपूर रिसोर्सेस ची वाढ होवू शकते, किंबहुना ती झालीच पाहिजे असा समंव्ययक यांचा प्रयास राहील. अगदी विस्तृत विविध विषयासंबंधी, टाइपवाइज, रिसोर्सेस शोधण्याचं आणि त्याच अपडेट देणे, रिसोर्सेस शोधणे ह्या संबंधी कार्यशाळा आयोजित करणे असे प्रोग्राम अविरत चालत राहील.

## संदर्भ

वर्मिन्स्की, ए., एंड ब्लँ चट् एम। एएलए मूलभूत मालिका: इलेक्ट्रॉनिक संसाधन व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे. अमेरिकन लाइब्रेरी एसोसिएशन

ओये पोर्टल. २०२५. एसएनडीटीमहिला विद्यापीठ.
https://sndt.ac.in/library/open-access-free-resources/oar-portal

# ज्ञान स्त्रोत केंद्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

**रुपाली राजेश गायकवाड**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ .,नाशिक.महाराष्ट्र

**सारांश -**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हा तंत्रज्ञानाचा एक संच आहे जो संगणकांना बोली आणि लिखित भाषा पाहणे, समजणे, भाषांतरित करणे, डेटाचे विश्लेषण करणे, शिफारशी करणे यासह विविध प्रगत कार्ये करण्यास सक्षम करते. "कृत्रिम बुद्धिमत्ता" हा शब्द जॉन मॅकार्थी यांनी तयार केला होता ज्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे जनक मानले जाते. जॉन मॅकार्थी हे अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ होते. कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुद्धिमान वर्तनास कृत्रिम बुद्धिमत्ता (artificial intelligence, AI) असे म्हणतात. ही कृत्रिम वस्तू साधरणत: संगणकच असते.आर्टिफिशियल इंटेलिजन्सची क्षमता कार्यान्वित करण्यासाठी विविध उपक्रम, तंत्रज्ञान, आणि अल्गोरिदम्स वापरतात.संगणक शास्त्रातील ही एक महत्त्वाची शाखा आहे. या शाखेमध्ये यंत्र शिक्षण (machine learning), त्यांचे बुद्धिमान वर्तन व परिस्थितीला जुळवून घेण्याची क्षमता आदींचा अभ्यास केला जातो. या शाखेतील संशोधन मुख्यत: स्वयंचलित कार्य करण्यासाठी आवश्यक असलेली बुद्धिमान वर्तणूक करू शकतील अशा यंत्रांशी निगडित आहे; उदाहरणादाखल नियोजन (planning), संयोजन (joining), निदान-विषयक प्रश्नांची उत्तरे शोधण्याची क्षमता,



हस्ताक्षर, आवाज आणि चेहरा ओळखण्याची क्षमता इत्यादी. अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्ता दैनंदिन जीवनातील समस्या सोडविणारी विज्ञानातील एक शाखा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता असणाऱ्या प्रणाली, या अर्थशास्त्र, आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, संरक्षण, कॉं प्युटर गेम्स (बुद्धिबळ इत्यादी) आणि संगणक प्रणाली यांमध्ये वापरल्या जातात.

कृत्रिम बुद्धिमत्ता या प्रणालीने मशीनला निर्णय घेण्याची क्षमता मिळते, आणि ती स्वतःच अनुभव करण्याची क्षमता विकसित करते. ती बहुसंख्यक काम करू शकते, जसे की डेटा विश्लेषण, स्वतःचे शिकणे, संवादाचे समजणे, समस्यांचे संशोधन, आपत्ती व्यवस्थापन, संगणनांचे संचालन, निर्णय निर्मिती, व्यवसायीकरण, वैद्यकीय निदान, दैनंदिन जीवनाशी निगडीत वैयक्तिक सल्ले, आणि अनेक अन्य क्षेत्रे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ग्रंथालयांमध्ये क्रांती घडवून आणत आहे, सेवा वर्धित करणारी, अनुभव सुधारणारी आणि व्यवस्थापन प्रक्रिया सुव्यवस्थित करणारी साधने देत आहे. ग्रंथालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे काही उल्लेखनीय ॲप्लिकेशन्स आहेत.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही यंत्रे असलेली बुद्धिमत्ता आहे ज्याच्या अंतर्गत ते मानवी मदतीने विविध कार्ये करू शकतात. AI च्या मदतीने, मशीन शिकू शकतील, समस्या सोडवू शकतील, गोष्टींचे नियोजन करू शकतील, विचार करू शकतील. कृत्रिम बुद्धिमत्ता हे मशीनद्वारे मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, कृत्रिम बुद्धिमत्ता दिवसेंदिवस झपाट्याने विकसित होत आहे आणि असे मानले जाते की नजीकच्या भविष्यात, कृत्रिम बुद्धिमत्ता

मानवी जीवनात खूप मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणणार आहे. या आधुनिक युगात आपले जीवन बहुतांशी संगणकावर अवलंबून आहे. संगणकाशिवाय जीवनाचा विचार करणे जवळजवळ अशक्य आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या प्रत्येक गोष्टीत आपल्याला संगणकाची आवश्यकता असते. त्यामुळे आपले जीवन सुसह्य व्हावे यासाठी संगणक बुद्धिमान बनवणे अत्यंत आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हा संगणकाचा सिद्धांत आणि विकास आहे, जो मानवी बुद्धिमत्ता आणि संवेदनांचे अनुकरण करतो, जसे की दृश्य धारणा, उच्चार ओळखणे, निर्णय घेणे आणि भाषांमधील भाषांतर. कृत्रिम बुद्धिमत्ताने तंत्रज्ञानाच्या जगात क्रांती घडवून आणली आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांची यादी**

**ChatGPT** - OpenAI द्वारे विकसित केलेले ChatGPT संवादात्मक टेक्स्ट तयार करण्यासाठी मोठ्या भाषा मॉडेल्सचा वापर करते. हे "मल्टीमॉडल" देखील आहे, म्हणजे ते आवाज, टेक्स्ट आणि इमेजमध्ये कंटेन्ट तयार करू शकते आणि समजू शकते.

**Jasper** - एक कृत्रिम बुद्धिमत्ता लेखन सहाय्यक जो वापरकर्त्यांना ब्लॉग, सोशल मीडिया आणि विपणन सामग्रीसाठी सामग्री तयार करण्यात मदत करतो, उत्पादकता आणि सर्जनशीलता वाढवतो.

**Grammerly** - एक लेखन सहाय्यक जो व्याकरण, विरामचिन्हे आणि शैली तपासतो, लेखन स्पष्टता आणि परिणामकारकता सुधारण्यासाठी सूचना प्रदान करतो.



**Copy.ai** - या साधनाचा वापर मार्केटिंग कॉपी, उत्पादन वर्णन आणि इतर लिखित सामग्री जलद आणि कार्यक्षमतेने निर्माण करण्यासाठी होतो.

**Writesonic** - हे लेखन साधन जे वापरकर्त्यांना जाहिराती, ब्लॉग पोस्ट आणि विविध उद्देशांसाठी उच्च-गुणवत्तेची सामग्री तयार करण्यात मदत करते.

**Rytr** - हे साधन सामग्री निर्मितीमध्ये क्रांती घडवून आणणारा AI लेखन सहाय्यक आहे. हे वापरकर्त्यांना ब्लॉग लेखनापासून ते सोशल मीडिया जाहिरातींपर्यंत 40+ वापर प्रकरणांमध्ये उच्च-गुणवत्तेची, मूळ सामग्री सहजतेने निर्माण करण्यास सक्षम करते. 30+ भाषा आणि 20+ टोनसाठी समर्थनासह विविध आणि आकर्षक लेखन शैली सुनिश्चित करते. त्याचा अंतर्ज्ञानी इंटरफेस आणि सामर्थ्यवान वैशिष्ट्ये, ज्यात साहित्यिक चोरी तपासक आणि रिच-टेक्स्ट एडिटर यांचा समावेश आहे.

**ClickUp** - क्लिकअप हे एक क्रांतिकारी कार्य आणि प्रकल्प व्यवस्थापन साधन आहे जे तुम्हाला अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यास मदत करते. क्लिकअप विविध वैशिष्ट्ये देखील देते जे कार्य व्यवस्थापन अधिक कार्यक्षम बनवते, जसे की सबटास्क, देय तारखा आणि टिप्पण्या.

**NotebookLM** - एक AI-सक्षम संशोधन सहाय्यक वापरकर्त्यांना विविध स्त्रोतांकडून माहिती व्यवस्थित आणि सारांशित करण्यात मदत करते व संशोधन उत्पादकता वाढवते.

**Futurepedia** - एक सर्वसमावेशक निर्देशिका जी वापरकर्त्यांना विविध AI टूल्स आणि सॉफ्टवेअर शोधण्यात आणि एक्सप्लोर करण्यात मदत करते, जे नवीन माहिती नियमितपणे अद्ययावत करते.

**Bolt.new** - हे साधन वापरकर्त्यांना कोडिंग आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कार्यात मदत करते, प्रोग्रामिंग प्रक्रिया सुव्यवस्थित करते. ही साधने AI ॲप्लिकेशन्सच्या वाढत्या लँडस्केपचा फक्त एक अंश दर्शवितात, प्रत्येक

वेगवेगळ्या डोमेनमध्ये उत्पादकता, सर्जनशीलता आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

## ग्रंथालयासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांची यादी

ग्रंथालय त्यांच्या सेवा आणि सुविधा वाढवण्यासाठी विविध AI साधनांचा अवलंब करत आहेत. विशेषत: ग्रंथालयाच्या वापरासाठी डिझाइन केलेल्या किंवा रुपांतरित केलेल्या काही लोकप्रिय एआय टूल्समध्ये हे समाविष्ट आहे

**ChatGPT** - चॅटजीपीटी हे ग्रंथालय सेवांमध्ये विशेषतः नैसर्गिक भाषा प्रक्रिया, मजकूर विश्लेषण आणि वापरकर्त्यांशी संबंधित क्षेत्रांमध्ये उपयुक्त साधन असू शकते. वापरकर्त्यांच्या प्रश्नांना सुसंगत आणि संदर्भानुसार संबंधित प्रतिसाद देण्याची क्षमता, परिणामकारकता वाढवू शकते. ग्रंथालय चॅटबॉट आणि व्हर्च्युअल असिस्टंट, जे ग्रंथालय वापरकर्त्यांना ऑनलाइन सेवा प्रदान करण्यासाठी अधिकाधिक महत्त्वपूर्ण होत आहेत.

**Quickchat** - ओपनएआय द्वारे समर्थित एक बुद्धिमान चॅट सहाय्यक जो सामान्य प्रश्नांना स्वयंचलित प्रतिसाद प्रदान करण्यासाठी ग्रंथालय वेबसाइट्समध्ये समाविष्ट केला जाऊ शकतो व वापरकर्त्याला सहाय्य करतो.

**Andi** - एक शोध साधन जे Google शोध परिणामांशी संरेखित करते, ग्रंथपालांना नवीन संशोधन दिशानिर्देश शोधण्यात आणि पुस्तकांच्या सूची सुचवण्यात मदत करते. Andi हे एक शोध इंजिन आहे जे चॅटबॉट म्हणून काम करते, जे तुम्हाला शोध सहाय्यक म्हणून मदत करते. हे रिअल-टाइम डेटा आणि सिमेंटिक शोध एकत्रित करते, संवादात्मक पद्धतीने परिणाम तयार करते.

**Microsoft Syntex** - मायक्रोसॉफ्ट सिंटेक्ससह, एआय आणि मशीन लर्निंगद्वारे शेअरपॉईंट लायब्ररीमध्ये दस्तऐवज पटकन व्यवस्थित आणि



वर्गीकृत करू शकता. सिंटेक्स दस्तऐवज प्रक्रिया, भाष्य आणि सामग्री एकत्रीकरणाची क्षमता देते. ग्रंथालय कॅटलॉगिंग आणि संसाधन व्यवस्थापन सुधारते.

**AI-Powered Recommendation Systems** - वापरकर्ता वर्तन, प्राधान्ये आणि ग्रंथालय संसाधनांचे विश्लेषण करून, या प्रणाली वापरकर्त्यांचा अनुभव सुधारण्यासाठी आणि संसाधन शोध गतिमान करण्यासाठी वैयक्तिक शिफारसी करतात. ते अत्याधुनिक अल्गोरिदम आणि मशीन लर्निंग वापरून हे साध्य करतात.

**AI-Driven Analytics** - ग्रंथालयवापरकर्त्यांच्या वर्तनाचे आणि प्राधान्यांचे मूल्यांकन करण्यासाठी, संकलन विकास धोरणे आणि संसाधन वाटपाची माहिती देण्यासाठी या साधनांचा वापर करतात.

**Tools AI for Cataloging** - एआय डेटा कॅटलॉग हे संस्थेतील डेटाबद्दल मेटाडेटा संचयित करण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. हे विविध डेटा स्रोत पाहण्यासाठी, नमुने शोधण्यासाठी प्रगत AI वापरते. हे साधन डेटा हाताने व्यवस्थापित करण्याचे कार्य कमी करते, ज्यामुळे डेटाची क्रमवारी लावणे, शोधणे आणि वापरणे सोपे होते. ही साधने अनुक्रमणिका स्वयंचलित करतात आणि संकल्पना ओळखून आणि संबंधित कीवर्ड नियुक्त करून ग्रंथालय कॅटलॉगची सुसंगतता आणि गुणवत्ता सुधारतात.

**AI Chatbots and Virtual Assistants** - ही साधने प्रश्नांची उत्तरे देतात आणि ग्रंथालयसेवा अधिक सुलभ करण्यासाठी 24/7 उपलब्ध संसाधनांसाठी मार्गदर्शन करतात चॅटबॉट्स वैयक्तिकरण, माहिती गोळा करणे, संशोधन आणि वापरकर्ता नेव्हिगेशनमध्ये देखील मदत करतात. दुसरीकडे, एआय व्हर्च्युअल असिस्टंट मुख्यतः लोकांना त्यांच्या दैनंदिन दिनचर्यामध्ये

मदत करतात, स्मरणपत्रे सेट करणे, संगीत प्ले करणे, कॉल करणे, स्मार्ट होम डिव्हाइसेस व्यवस्थापित करणे आणि मजकूरात भाषणाचे भाषांतर करणे यासारखी कामे करण्यात मदत करतात.

**AI for Accessibility** - AI ऍक्सेसिबिलिटी म्हणजे अपंग व्यक्तींसाठी ऍक्सेसिबिलिटी सुधारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर. जीवनाच्या विविध पैलूंमध्ये अपंग व्यक्तींना भेडसावणाऱ्या अडथळ्यांना आणि आव्हानांना सामोरे जाणाऱ्या AI उपायांचा विकास आणि अंमलबजावणी यात समाविष्ट आहे. ग्रंथालय संसाधने अपंग वापरकर्त्यांसाठी अधिक उपयोगी बनवतात.

**ChatPDF** - हे एक नाविन्यपूर्ण AI-शक्तीचे साधन आहे जे वापरकर्त्यांना PDF दस्तऐवजांसह नैसर्गिक भाषेत संभाषण करू देते. हे PDF मधून माहिती वाचण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि काढण्यासाठी प्रगत नैसर्गिक भाषा प्रक्रियेचा वापर करते, वापरकर्त्यांना त्यांच्या प्रश्नांना आणि प्रश्नांना जलद आणि अचूक प्रतिसाद प्रदान करते. ग्रंथपालांना लांबलचक शोधनिबंध पूर्ण न वाचता त्वरीत सारांशित करण्यास मदत करते. हे वेळेची बचत करते आणि वापरकर्त्यांना त्यांच्या कार्यास समर्थन देण्यासाठी संक्षिप्त, संबंधित माहिती प्रदान करण्यात मदत करते.

**Canva AI** - हे साधन इंटरनेट सामग्रीची लाखो पृष्ठे स्कॅन करतो. ते नंतर लिखित सामग्रीचा एक भाग किंवा AI-व्युत्पन्न प्रतिमा तयार करण्यासाठी यापैकी प्रत्येक स्रोतातून घटक निवडते. ग्रंथालय कार्यक्रम आणि सेवांच्या मार्केटिंगसाठी ग्रंथपाल कॅनव्हाच्या एआय वैशिष्ट्यांचा वापर करू शकतात. सुंदर ग्राफिक्स आणि प्रतिमा संरक्षकांना आकर्षित करण्यात आणि प्रतिबद्धता वाढविण्यात मदत करतात. सॉफ्टवेअरची बुद्धिमत्ता अद्वितीय सामग्री निर्मितीसाठी सक्षम आहे.



**Lexica AI** - AI कला साधने ग्रंथपालांना ग्रंथालयसंग्रहाचे व्हिज्युअलायझेशन आणि प्रतिनिधित्व करण्याचे नवीन मार्ग शोधण्याची परवानगी देतात. ग्रंथालयसामग्रीद्वारे प्रेरित AI-व्युत्पन्न प्रतिमा संप्रेषणांमध्ये सौंदर्यात्मक आकर्षण जोडू शकतात आणि सर्जनशील विचारांना उत्तेजन देऊ शकतात.

## ग्रंथालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे

१. कार्यक्षमता वाढवते - कृत्रिम बुद्धिमत्ता वेळ घेणारी कार्ये स्वयंचलित करते, ग्रंथालय कर्मचाऱ्यांना अधिक जटिल आणि मूल्यवर्धित कामांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते.

२. वापरकर्त्याच्या अनुभवात वाढ : कृत्रिम बुद्धिमत्ता शक्तीवर चालणारी साधने वैयक्तिक शिफारसी आणि त्वरित सहाय्य प्रदान करतात.

३. उत्तम संसाधन व्यवस्थापन: कृत्रिम बुद्धिमत्ता विश्लेषणे ग्रंथालयांना त्यांचे संग्रह परिपूर्ण करण्यात मदत करतात आणि वापरकर्त्याच्या गरजा आणि प्राधान्यांवर आधारित संसाधने अधिक प्रभावीपणे वाटप करतात.

४. सहज उपलब्ध : कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान ग्रंथालय संसाधने अपंग आणि भिन्न भाषा बोलणाऱ्या वापरकर्त्यांसाठी सहज उपलब्ध करून देतात.

५. निर्णयक्षमता : कृत्रिम बुद्धिमत्ता जे ग्रंथलयांना सेवा आणि संसाधन वाटपाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करतात.

## आव्हाने

फायदे असूनही, लायब्ररीमध्ये एआयचा अवलंब केल्याने अनेक आव्हाने देखील आहेत:

1. अल्गोरिदमिक पूर्वाग्रह: कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली प्रशिक्षण डेटामध्ये उपस्थित पूर्वाग्रह वारशाने मिळवू शकतात, संभाव्यपणे माहिती पुनर्प्राप्ती आणि शिफारस प्रणालींमध्ये पूर्वाग्रह कायम ठेवू शकतात किंवा वाढवू शकतात

2. गोपनीयतेची चिंता: कृत्रिम बुद्धिमत्ता च्या वापरासाठी बऱ्याचदा मोठ्या डेटासेटची आवश्यकता असते, ज्यामुळे संरक्षक डेटाचा नैतिक वापर आणि संरक्षण याबद्दल चिंता निर्माण होते.

3. कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्याचा अभाव: अनेक लायब्ररींना कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आणि व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक कौशल्य असलेल्या कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.

4. बजेटची मर्यादा: कृत्रिम बुद्धिमत्ता टूल्सची अंमलबजावणी करण्यासाठी तंत्रज्ञान, प्रशिक्षण यामध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक आवश्यक असू शकते

5. नैतिक बाबी: कृत्रिम बुद्धिमत्ता सेवांची नैतिक उपयोजन व्यावसायिक मानकांच्या अनुषंगाने सुनिश्चित करणे ही ग्रंथपालांसाठी एक महत्त्वाची जबाबदारी आहे.



6. डिजीटल डिव्हाईड: जर काही वापरकर्ता गटांना तंत्रज्ञानात प्रवेश नसेल किंवा मर्यादित डिजिटल साक्षरता कौशल्ये असतील तर लायब्ररीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर विद्यमान डिजिटल विभाजने वाढवू शकतो.

## निष्कर्ष

कृत्रिम बुध्दिमत्ता साधने ग्रंथालयामध्ये बदल घडवून आणत आहेत, असंख्य फायदे देत आहेत आणि ज्या आव्हानांना संबोधित करणे आवश्यक आहे ते देखील सादर करत आहेत. ग्रंथालय तंत्रज्ञानाशी जुळवून घेत माहितीसाठी, त्यांच्या सेवा वाढवण्यासाठी आणि त्यांच्या वापरकर्त्यांच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी AI चा लाभ घेत राहतील. भविष्यातील गरजा आणि प्राधान्यांचा अंदाज लावण्याची AI ची क्षमता ग्रंथालयांना त्यांच्या सेवा आणि संसाधनांचे अधिक प्रभावीपणे नियोजन करण्यात मदत करेल. ग्रंथालयांमध्ये नैतिक AI वापराचे मार्गदर्शन करण्यासाठी धोरणे आणि कार्यपद्धती विकसित करण्यावर वाढता भर दिला जाईल. कृत्रिम बुध्दिमत्ता ग्रंथालय कर्मचारी आणि वापरकर्ता यांच्यासाठी क्षमता विकसित करण्यासाठीचे महत्वाचे साधन वरदान ठरू शकते.

## संदर्भ

https://cloud.google.com/learn/what-is-artificial-intelligence
https://www.grtech.com/blog/top-ai-tools-for-librarians
https://www.researchgate.net/publication/338337072_Artificial_Intelligence_in_Libraries
https://www.vedantu.com/english/artificial-intelligence-essay
https://www.ijfmr.com/research-paper.php?id=22452

https://bloggervinita.com/top-ai-tools-for-content-writing-in-marathi/
https://mr.apphut.io/product/rytr-ai/
https://www.researchgate.net/publication/370204419_USE_OF_CHAT_GPT_IN_LIBRARY_SERVICES
https://shorturl.at/BHrDr
https://shorturl.at/3vbDE

https://lnkfwd.com/u/N3Srd5fR
https://lnkfwd.com/u/N3T6AC0u
https://lnkfwd.com/u/N3d_7upM

# सार्वजनिक ग्रंथालये एक लोकशिक्षण केंद्र

**प्रा. विजयकुमार पाईकराव**
सहयोगी प्राध्यापक आणि समन्वयक, विद्याशाखा ग्रंथालय
यशवंतराव चव्हाण महारष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक

**सारांश :** मानवी संस्कृति आणि निसर्गसंपत्ती यांचा सुसमन्वय साधणारे ज्ञान देणे हा सार्वजनिक ग्रंथालये लोक शिक्षण केन्द्राचा महत्वपूर्ण उद्देश आहे. अध्ययनार्थी वाचकांचे जीवन उंचावण्यासाठी त्यांच्या ज्ञानात न कौशल्यात वृध्दी करण्यासाठी, तसेच भौतिक प्रगती व ज्ञानाला नैतिक आधार देण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाची लोकशिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. प्रत्येक वाचकाला आपल्या ज्ञानार्जनातून व्यक्तिमत्वातील अंगभूत संतुलित गुणांच्या विकासासाठी सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान है लोकशिक्षण केंद्राचे कार्य होय . नवसमाजाच्या ज्ञानात्मक निर्मितीचा व चारित्राचा भक्कम पाया घालण्याचा कार्यानंद या मधून निरंतर सुरु आहे.

ज्ञानसंस्कार, कला - संस्कृती व क्रीडा संस्काराच्या कार्यात सार्वजनिक ग्रंथालये प्रारंभापासुनच आग्रही आहेत. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, अशांतता, अनाचार ह्या सारख्या प्रश्नांची सोडवनूक करण्यासाठी वाचन अत्यंत आवश्यक आहे.

"पुस्तक वाचन घडवते मस्तक,जे मस्तक होत नाही कुणाचे हस्तक" लोकशिक्षण केंद्राद्वारे वाचक अध्ययनार्थीच्याअष्टपैलू व्यक्तिमत्वात उत्कृष्टता, व भविण्याचा वेध घेण्याची अचूक क्षमता निर्माण होते. या द्वारे समाज निष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टीकोन, शीलसंवर्धन, समता सामाजिकन्याय हया लोकशाहिस पुरक मूल्याची वाढ व संवर्धन होते. तसेच आवश्यकते नुसार सुसंस्काराच्या व कल्याणाच्या योजनांचे आयोजन करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये अव्याहत पणे करत आहेत.



राधाकृष्णन आयोगाने १९४८ मध्ये म्हटल्या प्रमाणे 16 The purpose of all education. it is admitted by thinkers of East and West, is to provide a coherent picture of the Universe and an integrated way of life, we cannot be wise without some basis of knowledge and remain devoid of wisdom, since education is both a training of minds and a training of souls, it should give bath knowledge and Wisdom .

**क) ज्ञान -** शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये हा दृष्टिकोन समोर ठेऊन सार्बजनिक वाचनालये अनेक गरीब व गरजू ज्ञानार्थी वाचकांना ज्ञातस्त्रोत उपलबध करून देत आहेत. ज्ञान, आरोग्य, संभाषण, स्पर्धापरीक्षा इ.साठी विविध नवीन उपक्रम व योजना कार्यान्वीत करून वाचकांना भक्कम पाठबळ देण्याचे कार्य ही सार्वजनिक वाचनालये करताहेत. यातूनच सुसंस्कृतिला आधारभूत असणा-या व्यैयक्तिक व सामुहिक चारित्र्याचा पाया भक्कम होत आहे.

**ख) लोक उपक्रम -** खास अभ्यासाचे क्षेत्र म्हणून सखोल अध्ययनासाठी व गोपांग विकासाकरिता सहाय्यभूत होवू शकेल असे विशेष मार्गदर्शन आणि नार्जनात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी बाही:शाल करण्याचे आयोजन करून वाचकांची ज्ञान तृष्णा भागविण्यात येते. भारत हा गावातध्ये वसलेला देश असून प्रगतीच्या विकासाच्या वाटा शहरापासून गावापर्यंत पोहोचविण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालये लोकशिक्षणाचा कार्यानंद करत आहेत. शाश्वतसमावेशकग्रामीण विकास, शिक्षण-हक्क कायदा , जनजागृती,मानव विकास निर्देशांक, नैसरिकि संसाधने संवर्धन, महिला सक्षमिकरण, आपत्ती व्यवस्थापन स्त्री - भ्रुणहत्या विरोध, गावतळे, शेततळे, वनतळे, पाणलोट क्षेत्र

विकास, फळबाग, 'अपारंपारिक उर्जा स्त्रोत इ. साठी सार्वजनिक वाचनालयातील उपक्रमाबरोबर युवकांचे जथ्ये तयार होत आहेत.

जैवविविधता, सांस्कृतिक परंपरा, राहणीमान आरोग्य, आहार, पर्यटन, स्वयंरोजगार, स्वयं सहाय्यता बचतगट आणि महिला व बालकल्याण विषक क्षेत्रातील भरीव कार्य सार्वजनिक वाचनालयांचा लोक शिक्षणातील कार्याचा महत्वपूर्ण भाग ठरत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मानवी मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी तथागत गौतम बुध्द , संत कबीर , म. फुले, राजर्षी शाहू , महाराज छत्रपती शिवाजी महाराज , डॉ. बाबासाहेब आंबेडकर , चार्वाक, सावित्रिबाई फुले , महादेव गोविंद रानडे पंडिता रमाबाई व रमाबाई रानडे आदी समाज धुरिणांचा लोक शिक्षणाचा वसा ही सार्वजनिक वाचनालयांनी तेवत ठेवला आहे.

**ग )ज्ञानात्मक :** नवसमाज निर्मितीची उदात्तजीवन मूल्ये, सामाजिक सुसंवाद व परिवर्तनासाठी , कवी व्यंकटेश कल्याण यांच्या शब्दात

" वाचणं हे पेरणं असतं
तर लिहिणं हे
उगवणं उगवण्याची
चिंता करीत बसण्यापेक्षा
पेरणीला सुरुवात करूयात.
एक दिवस तुमच्या शेतातील
धान्य लोक पेरणीसाठी



नक्की घेऊन जातील.
हीच सार्वजनिक वाचनालयाची लोकशिक्षण विषयक " फलश्रुती

"हात नको, ज्ञान विचारांनी मने जोडा.ज्ञान - अज्ञाताचे आंतर तोडा माणूस म्हणून जन्मलो आहोत. वाचनरूपी ज्ञानगंगा घरोघरी अन कानोकानी नेऊ चला,, प्रथम लोकांच्या विचारात क्रांती होते मग आचार क्रांती होते. ही आंतरिक, जागृतीची क्रांती वाचनामुळे माणसाला ध्येयाप्रत नेते . मानवी प्रतिष्ठा है सर्वोच्च जीवन मूल्ये, सार्वजानिक वाचनालयांनी लोकांपर्यंत नेलेले आहे. आपल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक आयुष्याचा पाया, बुध्दीवाद हाच ठेवण्यासाठी अन मानवी मूल्यांना मान देण्यासाठी वाचनामृत ज्ञान है। मानवी जीवनाचा पाया होय.

आपली पोकळी कुठे आहे ते आपणच शोधावी. या करिता उपयुक्तता हा महत्वाचा गुण सविजनिक वाचनालये जनमानसांपर्यंत पोहचवतात. उपदेशात्मकते पेक्षा कार्यात्मकता हा गुण लोकशिक्षणाचा आहे. उपदेशांनी तान निर्माणहोतो.

माणसांचे व्यक्तिमत्व जनुक आणि मनुका मुळे ठरत असले तरी, वाचन अनुभवांनी आता अधिक संमृध्द करता येते. सार्वजतिक वाचनालयरुपी ज्ञानगंगेमध्ये वाचनानी पवित्र होता येते. अनअशाने पाणीही गढूळ करता येते. मग आपण काय करायचं ते ठरवूयात. जिद्द भरघोस ज्ञानार्जनाची, स्वयं अधयन कष्टाला जोड सार्वजनिक वाचनालयाची, ज्ञान कौशल्य संवर्धनातून प्रगती करुया समाजाची,

अनेक सार्वजनिक ग्रंथालयाचा उपयोग व्यावसायाभिमुख लोक व्यक्तिगत प्रगतीसाठी करून घेत आहेत. सज्जनशक्ती, दुर्जनशक्ती, विद्वतजन शक्ती, महाजनशक्ती अन जनशक्तांनी एकत्र करण्याचे कार्य या द्वारे होत आहे .

ज्ञान के मंचपर सब एक समान है।
विधि का विद्यान पलट दे.
की ब्रम्हास्त्र ज्ञान है।
तो आज से गन लें ये बात गाव बांध ले,
कि कर्म कर्म के कुरुक्षेत्र में
ना रूप काम आता है,
ना झूठ काम आता है।
ना जाति काम जाती है,
ना बाप काह नाम काम आता है।
सिर्फ ज्ञान ही आपको आपका हक दिलाता है।
वह ज्ञान सार्वजनिक वाचनालय लोक शिक्षाका केन्द्र है।

## आंतरविद्याशाखा : भारतीय विद्यापीठांमधील एक उभरती अभ्यास शाखा

प्रो (डॉ ) मीनल ओक
ग्रंथपाल (प्रोफ- श्रेणी १४), एम इ एस आय एम सी सी पुणे भारत आणि
संचालक स्पेशल लायब्ररी अस्सोसिएअशन (२०१५-२०१७ ) USA

सारांश : भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाची महासत्ता बनविण्याकरिता, भारत सरकारने शिक्षण क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल करण्याच्या उद्देशाने नवीन शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी केली. ह्या धोरणामध्ये भारतीय परंपरा आणि मुल्ये ह्यावर भर देवून "विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास" हा केंद्रबिंदू ठेवण्यात आला. विद्यार्थ्यांची बहुविध बुद्धीमत्ता विकसित व्हावी ह्यासाठी धोरणामध्ये विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशील विचार (Creative Thinking), चिकित्सक विचार(Critical Thinking), संभाषण कला (Communication) सहकार्य (Collaboration) सहवेदना (Compassion) आणि आत्मविश्वास (Self-confidence) ह्या कौशल्यांवर भर दिला आहे, जेणेकरून वैश्विक प्रतिनिधित्व करणारे असे अधिक परिपक्व भारताचे नागरिक शैक्षणिक क्षेत्रामधून विश्वाला प्राप्त होतील.

नवीन शिक्षणिक धोरणानुसार (National Education Policy 2020), सद्यस्थितीतील विषयांमध्ये असणारी शैक्षणिक शाखांची साचेबध्द पद्धती न राहता, आंतरविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आगामी काळामध्ये अधिक परिश्रम घेतले जातील. विद्यापीठांमध्ये दोन वा अधिक विषयांमधील पद्धती ज्ञान आणि दृष्टीकोन एकत्रित करणारे आणि संशोधन विकसित होण्याकरिता आंतर्विद्याशाखांचा उदय झाला. भारतीय विद्यापीठांमध्ये आज ह्या आंतरविद्याशाखा विकसनशील टप्प्यावर आहेत.



आंतरविद्याशाखा एक संकल्पना, त्याचे स्वरूप आणि व्याप्ती ह्यावर ह्या लेखाद्वारे प्रकाश टाकण्यात आला आहे.

शोध संज्ञा: आंतर्विद्याशाखा, नवीन शैक्षणीक धोरण, आंतरविद्याशाखीय अध्यापन, आंतरविद्याशाखीय संशोधन

---

प्रस्तावना :

माणसाला आपले जगणे अधिक सुकर करण्यासाठी जगतातील अनेक संकल्पनांचा अभ्यास करावा लागतो. मानवी जीवन हे शांततामय आणि समस्याविरहित झाले तर ते अधिक सुकर आणि कार्यक्षम बनेल, असे जरी असले तरी समस्या सोडविणे हि प्रत्येक वेळेस सहजसोपी प्रक्रिया असेलच असे नाही तर अनेकदा ती क्लिष्ट असते. ह्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नवीन ज्ञानाची निर्मिती करून त्याचे उपयोजन करणे हे अत्यंत आवश्यक असते.

वरील बाबींचा विचार करता असे लक्षात येते कि केवळ एकाच विषयाचा अभ्यास केल्याने व्यक्तींकरिता ज्ञानाचे स्वरूप सीमित राहाते आणि समस्यांचे निराकरण करण्यावरही एकप्रकारच्या मर्यादा येतात, म्हणूनच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकात बऱ्याच देशांमधील विद्यापीठांमध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांना प्राधान्य दिलेले आढळते. विद्यापीठीय अभ्यासक्रमांमध्ये परिवर्तन होऊ लागल्याने पाश्चिमात्य देशांमध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासात वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमांची निर्मिती झालेली आपल्याला आढळते. विद्यार्थ्यांना कोणतेही विषय निवडण्याचे कमालीचे स्वातंत्र्य, नवसंकल्पनांनी भारलेले पदवी पदव्यत्तर आणि संशोधन पातळीवरील

अभ्यासक्रम, तसेच ह्या संकल्पनांचे झालेले उपयोजन हे पाश्चिमात्य देशांमधील आंतरविद्याशाखीय अभ्याक्रमांचे वैशिष्ट्य आहे. जिज्ञासूंना अनेकविध विषयांचा एकत्रीतरीत्या अभ्यास करून नवज्ञाननिर्मिती करणे आणि अनेकविध दृष्टीकोनातून समस्येवर विचार करणे हे आंतर्विद्याशाखीय शिक्षणमुळे साध्य होते. ज्ञानाच्या विभागीय रचनेऐवजी, त्याच्या एकात्मिक रचनेवर आंतरविद्याशाखेचा भर आहे.

आंतर्विद्याशाखा : संकल्पना

आंतरविद्याशाखीय हि संकल्पना प्रमुख्याने दोन किंवा दोनापेक्षा जास्त विद्याशाखांचे एकत्रीकरण करून प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेल्या विद्यापीठीय उपक्रमाला, विभागाला, विद्याशाखेला आंतरविद्याशाखीय म्हणले जाते. आंतरविद्याशाखीय अध्यापन ह्या अध्यापनशाखीय दृष्टिकोनामध्ये विविध विषयामधील संकल्पनांचे पाठ्यस्वरुपामध्ये प्रभावी एकत्रीकरण! ह्या सर्जनशील आणि आगळ्या स्वरूपामुळे विध्यार्थ्यांना अनेकविध दृष्टीकोंतून विषयांचे अध्ययन आणि परीक्षण, अवलोकन करण्याची प्रेरणा मिळते.

आंतरविद्याशाखीय अध्यापन :

पारंपारिक अध्यापन पद्धतीमधील अध्ययनापेक्षा वेगळे असे आंतरविद्याशाखीय अध्यापन विद्यार्थ्यांना विविध विषयांची हाताळणी अधिक परिणामकारकतेने करण्याकरिता आणि परिणामी अधिक परिपक्वता आणण्यासाठी उद्युक्त करते .

आंतरविद्याशाखीय अभ्याक्रमांतर्गत अनेक विषयांचे एकत्रीकरण (Interconnected Courses) केल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक विषयांच्या परस्पर



ज्ञानिक संबंधांचा एकाच वेळेस अभ्यास करण्याची संधी मिळते, उदारणार्थ अमेरिकेमधील फिलाडेल्फिया येथील ड्रेक्क्षेल विद्यापीठामध्ये MS उपक्रमांतर्गत सुती धागे आणि त्याची गुणवत्ता सुधार उपक्रमाकरिता Fashion Designing आणि Engineering ह्या अभ्यासक्रमांचे झालेले एकत्रीकरण. विषयानेवाजी एखाद्या संकल्पनेवर आधारित (Thematic Units) अभ्यासक्रम संकल्पल्यामुळे , विद्यार्थ्यांची जटील विषयांमधील समाज वाढून एखाद्या समस्येचे आकलन करण्याची आणि सखोल अभ्यास करण्याची क्षमता वाढते . अनेकोविध विषयांचे एकत्रीकरण केल्यामुळे विविध विषयांचे अध्यापक अध्यापनामध्ये सहभागी झाल्यामुळे सांघिक अध्यापन दृष्टीकोन वाढीस लागत असल्याने सहयोग वाढीस लागतो. आंतरर्विद्याशाखा पद्धती हि प्रकाल्पधारित शिक्षणास (Project Based) प्राधान्य देणारी आहे. यामध्ये जागतिक समस्यांवर आधारित प्रकल्पांवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्य करण्याची संधी लाभून विविध विषयांवर आधारित दृष्टीकोनामधून अभ्यास केला गेल्याने समस्यांचे निराकरण करण्याच्या सर्वांगिक दृष्टीकोनास चालना मिळते. अनेक विषय समाविष्ट असलेल्या तत्कालीन समस्या आणि निराकरण अभ्यासण्यासाठी व्यष्टी अध्ययन (Case Study) पद्धतीचा वापर केला जातो, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे केले जाणारे बहु अनुशासन संघ , होलिस्टिक ग्रेडिंग/ सर्वांगीण मुल्यांकन म्हणजे एकाच विषयात विद्यार्थ्यांचे मूल्यमापन न करता विविध विषयांमध्ये ज्ञान लागू करण्याच्या क्षमतेवर आधारित ते केल्यामुळे समग्र आकलन पद्धतीस न्याय मिळतो.

जगामध्ये होणारे आंतरराष्ट्रीय बदल लक्षात घेवून आणि जागतिक पटावर, भारतीय विद्यार्थ्यांची अधिक भरभराट व्हावी ह्या हेतूने, तसेच, भारतीय शिक्षण

पद्धतीला जागतिक पातळीवर समावेशकता प्राप्त होण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) अंमलात आणले; नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिलेला आढळतो, ह्यामध्ये बहुविध बुद्धीमत्ता विकास हि आंतरविद्याशाखीय संकल्पना आहे. ह्या आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनानुसार व्यक्तीची बुद्धीमत्ता केवळ एकमोलक मापन न राहता ती विविध क्षेत्रांमधून व्यक्त होते.

आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन आणि हॉवर्डचा बुद्ध्यांक सिद्धांत:

हार्वर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक हॉवर्ड गार्डनर ह्या अमेरिकी मनोवैज्ञानिकांनी मानवी बुद्ध्तीमत्तेचे सिद्धांत आपल्या “Frames of Mind : Theory of Multiple Intelligences ” (१९८३) ह्या पुस्तकाद्वारे मांडून व्यक्तीची बुद्धीमत्ता केवळ एकमोलक मापन ( सामान्य बुद्धीमत्तेचे मोजमाप जे बुद्ध्यांक चाचणीद्वारे मोजली जाते) नसल्याचे सांगितले. तर व्यक्तीची बुद्धीमत्ता नैसर्गिक क्षमता असून ती भिन्न क्षेत्रांमधून क्षेत्रांमधून व्यक्त होते असे सिद्धांताद्वारे मांडले .हा सिद्धांत मनाच्या बहुवचन दृष्टीकोनावर आधारित आहे .

गार्डनर यांनी आठ समावेशन निकषांवर आधारित मालिका विकसित केली, ज्यामध्ये वैज्ञानिक निकषांवर आधारित केलेले व्यक्तींच्या आठ बुद्धीमात्तांचे मापन करताना पहिली भाषिक बुद्धिमत्ता – बोली आणि लिखित भाषेबद्दल संवेदनशीलता, भाषा शिकण्याची क्षमता , भाषा वापरण्याची क्षमंता जसे वकील , वक्ते , लेखक, पत्रकार ह्या कार्यक्षेत्रातील व्यक्तींची भाषिक बुद्धिमत्ता; दुसरी तर्किक बुद्धीमत्ता म्हणजे तर्कीत्दृष्ट्या समस्यांचे विश्लेषण करण्याची, तसेच गणितीय क्रिया पार पडण्याची आणि वैज्ञानिकदृष्ट्या समस्यांची तपासणी करण्याची क्षमता जसे गणीतज्ञ , शास्त्रज्ञ , संगणक विश्लेषक क्षेत्रातील



व्यक्तींची गणितीय बुद्धीमत्ता ; तिसरी -स्थानिक/अवकाशीय बुद्धीमत्ता म्हणजे अचूकपणे दृश्य-स्थानिक जग अचूकरीत्या जाणण्याची क्षमता जसे वैमानिक, वस्तुशास्त्राज्ञ यांची उच्च स्थानिक बुद्धीमत्ता; चौथी -शारीरिक बुद्धीमत्ता म्हणजे शरीरील सामर्थ्य , निपुणता आणि समन्वय क्षमता ह्यात समाविष्ट आहे जसे धावपटू , नर्तक ह्यांची शारीरिक निपुणता ; पाचवी – संगीत बुद्धीमत्ता म्हणजे संगीताचे स्वरूप जाणण्याची , तयार करण्याची क्षमता जसे गायक , संगीतकार यांना असलेली उच्च संगीत बुद्धीमत्ता; सहावी - आंतर्वैयाक्तिक बुद्धीमत्ता (Interpersonal Intelligence) म्हणजे इतर लोकांचे हेतू , प्रेरणा आणि इच्छा समजून घेण्याची क्षमता , त्याबरोबरच इतरांबरोबर कार्य करण्याची क्षमता जसे मानसशास्त्रज्ञ, व्यवस्थापक , शिक्षक ह्यांची उच्च अंतर्वैयाक्तिक क्षमता ; सातवी – आत्मावैयाक्तिक/ आंतर्वैयाक्तिक बुद्धीमत्ता म्हणजे स्वतःच्या जीवनाचे प्रभावी  नियमन यामध्ये प्रामुख्याने आत्म जागरुकता , वैयक्तिक जाणीव सपाट करण्याची क्षमता यांचा अंतर्भाव आहे जसे समुपदेशक , धर्मगुरू , उद्योजक यांच्यामधील आत्मवैयाक्तिक बुद्धीमत्ता ; आठवी - निसर्गवादी बुद्धीमत्ता – ह्यामध्ये असंख्य प्रजाती प्राणी आणि नैसर्गिक वनस्पतींच्या प्रजाती ओळखणे, वर्गीकरण करणे अंतर्भूत आहे , जसे वनस्पती आणि प्राणी शास्त्रज्ञांमध्ये असणारी निसर्गवादी बुद्धीमत्ता. ह्याप्रमाणे विश्लेषण केलेले आढळते .  आंतर्विद्याशाखीय दृष्टिकोनानुसार एखाद्या व्यक्तीची बुद्धीमत्ता काही क्षेत्रामध्ये कमी तर काही क्षेत्रामध्ये जास्त (सामर्थ्य आणि कमकुवतपणाचे स्तर) असू शकते, आणि बुद्ध्यांक मूल्यमापन करण्याकरिता अधिक व्यापक आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन आवश्यक आहे .

महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१७ मध्ये "आंतर्विद्याशाखा" हा एक नवीन स्वतंत्र अभ्यासक्रम म्हणून समाविष्ट करण्यात आला. याचा उद्देश प्रामुख्याने विद्यार्थ्यांना या शाखेच्या माध्यमातून अनेक विविध विषयाच्या ज्ञानाचा समन्वय प्रभावीपणे करता येवून एकत्रित ज्ञान प्राप्त करता यावे हा आहे. भारतीय शैक्षणिक धोरणामध्ये मुख्यतः शिक्षण शाखांमधील कप्पाकरण दूर करण्याकरिता आंतरविद्याशाखीय शिक्षण संकल्पनेला प्रोत्साहन देणे, बहुविद्याशाखीय शैक्षणिक विद्यापीठे , आंतरविद्याशाखीय मुख्य विषय शिक्षण, ह्या घटकाचा अंतर्भाव केला आहे. अशा स्वरूपाच्या अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी दोन विद्याशाखांमधील परस्पर संबंध समजावून घेतला पाहिजे हा प्रमुख विचार नवीन शैक्षणिक धोरणामध्ये मांडला आहे.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि आंतरविद्याशाखा :

नवीन शैक्षणिक धोरण हे एकंदर शिक्षण प्रणालीमध्ये अमुलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे , कारण ह्या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे व्यावसायिक शिक्षण (कौशल्य विकास ), आंतर राष्ट्रीय स्तरावर गुणवत्तेची जोपासना, मुक्त दूरस्थ शिक्षणास चालना, दिव्यांग शिक्षार्थ्यांसाठी सहज प्रवेश आणि सुविधा देण्यार भर , आणि ह्या सर्वांबरोबर बहुविद्याशाखीय प्रणाली म्हणजेच विद्यार्थ्यांना एकाच शाखेत अडकून न राहता, विविध शाखांमधील आंतरविद्याशाखीय अध्ययनाला प्रोत्साहन दिले जावून विद्यार्थ्यांना विषयांचे व्यापक ज्ञान अधिक परिणामकारतेने प्राप्त होईल.

आंतरविद्याशाखीय संशोधन :

दोन किंवा दोनपेक्षा अधिक विद्यांचा एकत्रितरीत्या शोधक अभ्यास म्हणजे आंतरविद्याशाखीय संशोधन! ह्या संशोधन प्रक्रीयेमध्ये प्रमुख्याने दोन अथवा



दोनपेक्षा जास्त शाखांचा संघात्मकरित्या अभ्यास केला जातो, प्रामुख्याने एखाद्या विद्याशाखेचे इतर विद्याशाखांमधील उपयोजन किंवा स्थान अभ्यासण्यासाठी हे संशोधन केले जाते. जसे व्यवस्थापनाचे इतर विषयांमधील उपयोजन- ग्रंथालय व्यवस्थापन, हॉटेल व्यवस्थापन, टुरिझम व्यवस्थापन, पर्यावरण व्यवस्थापन, हॉस्पिटल व्यवस्थापन इत्यादि. म्हणून, ज्ञानाच्या परीपुर्ततेसाठी विद्याशाखांच्या एकत्रितरित्या केल्या जाणाऱ्या अभ्यासपूर्ण प्रक्रीयेमुळे अंतिम/उच्च पातळीवरील ज्ञानप्राप्ती होणे, समस्यांवर उत्तमोत्तम पर्याय प्राप्त होणे ह्या बाबी साध्य होऊन पर्यायाने, अखिल विश्वाची अधिक समाधानकारक प्रगती साधन्यास उपयुक्त ठरते. ज्ञानशाखामध्ये परस्पर सहाय्यकत्व असणे हे विश्वाच्या परीपक्वतेच्या दृष्टीने एक महत्वाचे अंग आहे .

ग्रंथालय आणि माहीतीशाश्त्राचे आंतरविद्याशाखीय स्वरूप :

ग्रंथालयशास्त्राचा विकास हा विज्ञान कला मानव्य अशा अनेकविध शाखांच्या योगादानातून झालेला आढळतो; जसे माहितीविज्ञान ज्ञानशास्त्र ज्ञानाचे समाजशास्त्र , ग्रंथालयीन अध्या पनामध्ये तसेच ग्रंथालायांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, माहितीचा वापर – गोपनीयता आणि नितीमत्ता, बहुसांस्कृतिक समाजमधील माहिती प्रसार , ग्रंथालय व्यवस्थापन - व्यवस्थापनामधील तत्वांचा आणि विविध तंत्रांचा ग्रंथालय प्रशासनामध्ये होणारा वापर इत्यादी; तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्तरामधील संकल्पनांचा होणारा इतर शाखांमध्ये वापर , उदारणार्थ बिब्लिओमेट्रिक विश्लेषणाचा विविध शाखांमधील संशोधनामध्ये होणारा प्रभावी वापर. अंततः ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे सुद्धा एक सतत विकसित होणारे आंतरविद्याशाखीय शास्त्र आहे.

समारोप :

आंतरविद्याशाखीय शिक्षनाच्या माध्यामतून विषयांचे एकत्रितपणे अध्ययन केलेगेल्याने जिज्ञासु वृत्ती आणि नाव ज्ञान निर्मितीस चालना आणि एका प्रश्नावर अनेकविध अंगांनी विचार करणे शक्य होते .

श्री विष्णू पुराणामध्ये उल्लेख केलेल्या श्लोकानुसार

"तत्कर्म यन्न बंधाय सा विद्या या विमुक्तये। आयासायापरम् कर्म विद्यान्या शिल्पनैपुणम्।"

अर्थात, कर्म ते आहे , जे बंधंत बांधत नाही , विद्या जी मुक्त करते; इतर सर्व क्रिया केवळ निरर्थक क्रियाकलाप आहेत आणि इतर सर्व अभ्यास केवळ कारागिरी आहेत

अर्थात , सर्व पारंपारिक ज्ञानशाखांची बंधने नष्ट करून विद्येला खऱ्या अर्थाने मुक्त केल्यास प्रगती निश्चित आहे !!!



संदर्भ सूची Barbara Sosińska-Kalata. (2000) .Interdisciplinarity of Information Science Research: Introduction. Poland, ZIN 2020, 58(1A), 9–2.

१. Boix Mansilla V., Duraisingh E. D. (2007). Targeted assessment of students' interdisciplinary work: An empirically grounded framework proposed. *Journal of Higher Education*, (2), 215–237. [Google Scholar]

२. Frodeman R., Klein J. T., Pacheco R. C. D. S. (Eds.). (2017). *The Oxford handbook of interdisciplinarity*. Oxford, UK: Oxford University Press. [Google Scholar]

३. Grossman P. (Eds.), *Interdisciplinary curriculum: Challenges to implementation* (pp. 17–38). New York: Teachers College Press. [Google Scholar]

४. Gardner, Howard .( 2006) Multiple Intelligences. Perseus , USA.

५. Voice Mansilla V., Miller W. C., Gardner H. (2000). On disciplinary lenses and inter-disciplinary work. In Wineburg S., Gouvea J. S., Sawtelle V., Geller B. D., Turpen C. (2013). A framework for analyzing interdisciplinary tasks: Implications for student learning and curricular design. *CBE—Life Sciences Education*, (2), 187–205. [DOI] [PMC free article] [PubMed] [Google Scholar]

६. **सोनवणे , संजीव . (२०००). नव्या ज्ञानाच्या निर्मितीसाठी . सकाळ**